नॅक 'ब' दर्जा प्राप्त

# रेणुका कॉलेज

बँक ऑफ इंडिया जवळ, नागपूर–37. फोन : 07103–281455
E-mail : renukamv.ngp@gmail.com Website : www.renukacollege.org

RENUKA SHIKSHAN PRASARAK MANDAL, NAGPUR
Atta-Deep-Bhava

## स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

वार्षिकांक
२०२०-२१ व २०२१-२२

# शब्दांकुर



## कोरोना विशेषांक

*Our Inspiration*



**DR. BABASAHEB AMBEDKAR**

शिका - संघटीत व्हा - संघर्ष करा

*Our Tower of Strength*



**LATE. SHRI. EKNATH GEDAM**

**Founder, Renuka Shikshan Prasarak Mandal, Nagpur.**

"Some people are born and die
but few of them are born to serve humanity
and he was truly one of them".

# RENUKA COLLEGE

Accredited with "B" Grade by NAAC Bangalore

**Near Bank of India, Besa, Nagpur-37.**

## B.A., B.Com. Junior Arts & Commerce College

Accredited with Grade "B" by NAAC (Banglore), Permanenlty Affiliated to Rastrasant Tukadoji Maharaj Nagpur University


**Ph. No. : 07103-281455 | renukamv.ngp@gmail.com | www.renukacollege.org**



**Dr. Babanrao Taywade**

**President**

Sachidanand Shikshan Sanstha,
Nagpur.



**Himanshu Eknath Gedam**

**Chairman**

Renuka Shikshan Prasarak
Mandal, Nagpur.



**Smt. Manjusha Gedam**

**Secretary**

Renuka Shikshan Prasarak
Mandal, Nagpur.



**Dr. Jyoti Patil**

**Principal**

Renuka College Besa
Nagpur.

वार्षिकांक
२०२०-२१ व २०२१-२२

# शब्दांकुर

## ❊ संपादकीय मार्गदर्शक मंडळ ❊

### प्राध्यापक प्रतिनिधी



**डॉ. प्रेमा लेकुरवाळे**
मुख्य संपादक



**डॉ. रमणिक लेनगुरे**
सह. संपादक



**प्रा. अब्दुल शमीम**
सह. संपादक

### विद्यार्थी प्रतिनिधी



**मानसी केणे**
B.A. III



**स्मिता उमरे**
B.A.II



**सांकेत बांगडे**
B.Com III



**प्रफुल कोल्हे**
B.Com II



**दिव्या वानखेडे**
B.Com I



**सशिम मेश्राम**
B.A. II



**सेजल पुंजे**
B.A. III



**केशर शिवणकर**
B.A.II



**सारंग बावनकुळे**
B.A.I



**प्रतिक काठोळे**
B.A.I

# RENUKA COLLEGE

Accredited with "B" Grade by NAAC Bangalore

## COLLEGE DEVELOPMENT COMMITTEE
## 2019-20 TO 2023-24

| Sr.No. | Particular | Name |
|---|---|---|
| 01 | Chairperson of the Management | Mr. Himanshu Gedam |
| 02 | Secretary of the Management | Mrs. Manjusha Gedam |
| 03 | Nominated by the Principal | Dr. Atul Mahajan |
| 04 | Elected Three Teachers, included One Women Member | Dr. Kailash Fulmali<br>Dr. Rahul Nagrale<br>Dr. Harshana Sonkusare |
| 05 | One Non-teacing employee | Mr. Madhusudan Charde |
| 06 | Four Local Members, Nominated by the Management, included One Alumnus Member | Dr. Narendra Dixit<br>Mr. Sanjay Bandre<br>Dr. Vinod Gawande<br>Mrs. Shradha Pophali |
| 07 | IQAC, Co-ordinator | Prof. Abdul Shamim |
| 08 | President of the College Students Council | Mr. Kesar Shivankar |
| 09 | Secretary of the College Students Council | Mrs. Pranjal Jumnake |
| 10 | Principal of the College, Secretary | Dr. Jyoti Patil |

## *Principal's Message: Rise Again!*



*It is really heartening to see that after a prolonged COVID 19 pandemic hiccups for at least nearly one and half years since the first lockdown Feb 2020, we have risen from the dark days like the Phoenix from the ashes of shattered dreams to bring forth our college magazine "SHABDANKUR" with its double edition. The activities of the college were mainly switched to online mode and various regular academic activities were hampered during lockdowns and quarantines. Our college magazine's digital version was uploaded on our website during the lockdown hoping to be active again as Steven Federle has chanted, "And I'll live again, though the others think I'm gone,/and I'll rise again, in this silent grave my faith is strong!"*

*As we are celebrating our 75th year of Independence as 'Amrit Mahotsava', we have conducted various programmes and competitions to salute our freedom fighters and leaders. I am pleased to see students have come up with their creative verve and contributed generously their write-ups on different topics related to their personal experiences of COVID 19 pandemic and our glorious 75 years of Independence with patriotic fervor.*

*I congratulate the editorial team for their sincere and persistent efforts and faith in rising again in bringing this dual issue of "SHABDANKUR" as a special edition on CORONA and our 75th year of Independence. Hope this issue will enrich your knowledge and invigorate your spirits. I'll conclude with the famous lines of Nobel Laureate Rabindranath Tagore,*

*"Where words come out from the depth of truth…..*
*Where the mind is led forward by thee into ever-widening thought and action -*
*Into that heaven of freedom, my Father, let my country awake."*

Principal
**Dr Jyoti Patil**

# संपादकीय 



विशेषांकाची निर्मिती

सातत्याने प्रकाशित होणाऱ्या महाविद्यालयीन शब्दां कुर २०२०-२१ आणि २०२१-२२ या सत्रात 'कोरोना' आणि 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' या विशेषांकाचे संपादन करताना आम्हाला आनंद होत आहे. कोरोना काळामध्ये एक प्रकारे जीवनाची झुंज द्यावी लागली. जास्तीत जास्त आपण गमावले. परिस्थितीत काही घटकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता समाजाप्रती सहकार्य केले. त्याचप्रमाणे 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव' थोर पुरुष, क्रांतिकारकांचे कार्य अगणित आहे. हा समन्वय साधण्याचा आम्ही प्रयत्न केला. कोरोना काळातील परिस्थिती गंभीर असताना आम्ही काही ऑनलाईन उपक्रम राबविले. राष्ट्रीय स्तरावर ऑनलाईन निबंध स्पर्धा घेण्यात आल्या,

ऑनलाइन जन आरोग्य सुरक्षा वर्ष म्हणून महानुभाव वेध प्रमाणपत्र परीक्षा घेण्यात आली. कोरोना काळामध्ये आर्थिक व्यवस्थेवर खूप परिणाम पडलेला होता त्या अनुषंगाने ऑनलाइन चर्चासत्रे घेण्यात आली. आमच्या रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ नागपूर संस्थेचे संस्थापक माननीय स्वर्गीय एकनाथजी गेडाम यांच्या विचारानुसार कितीही संकटे आले तरी त्यावर मात करून चांगल्या विचारांची पेरणी ही व्हायलाच पाहिजे. ज्ञान हे नदीसारखे प्रभावी आहे हा त्यांचा मुख्य उद्देश होता. त्यांच्या विचारांच्या विचारधारेवर आम्ही मार्गक्रमण करीत आहोत.

कोरोना काळातील स्मृती आणि स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे महत्त्व नक्कीच येणाऱ्या पिढीला स्मरणात राहील. या विशेषांकाच्या निमित्ताने ती माहिती इतरांपर्यंत पोहोचेल. मी जरी संपादक असले तरीही वार्षिक अंकांचे संपूर्ण श्रेय माझे एकटीचे नसून संपूर्ण सहकारी वर्गाचे ही आहे. शब्दांकुर वार्षिक अंकांच्या यशस्वीतेसाठी रेणुका शिक्षण प्रसारक मंडळ नागपूरचे अध्यक्ष माननीय हिमांशू गेडाम संस्थेचे सचिव माननीय मंजुषा गेडाम तसेच महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. ज्योती पाटील या मान्यवरांचे बहुमूल्य मार्गदर्शन व सहकार्य लाभल्यामुळे निर्धारित वेळेत वार्षिक अंकाचे प्रकाशन होऊ शकले. त्याबद्दल सर्वांचे शतश: आभार! प्रसाद क्रिएशनचे संस्थापक प्रीती कानडे मॅडम तसेच त्यांच्या सहकारी वर्गाबद्दलही मी रेणुका कॉलेजच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करते.

धन्यवाद!

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

काळोखातूनी विजयाचा ये पहाटचा तारा
प्रणाम माझा पहिला तुजला मृत्युंजय वीरा !!
कवी- कुसुमाग्रज

**डॉ. प्रेमा चोपडे लेकुरवाळे**
(मराठी विभागप्रमुख)

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेख/कविता | पुष्ठ क्र. |
|---|---|---|
| 1 | युगप्रवर्तक  स्वामी विवेकानंद | 1–2 |
| 2 | कोविड –19 महामारीमुळे भविष्यात होणारा परिणाम | 3–5 |
| 3 | कोविड –19 महामारीमुळे मानवांच्या जिवनशैलीवर होणारा परिणाम | 6–7 |
| 4 | कोरोना–सामाजिक व आर्थिक परिणाम | 8–11 |
| 5 | कोविड – 19 महामारीमुळे होणारे परिणाम | 12–13 |
| 6 | कोरोनातील अनुभव | 14–15 |
| 7 | कोरोना (कोविड – 19) चा भारत पर होनेवाला परिणाम | 16–20 |
| 8 | भारतीय स्वातंत्र्य आंदोलन क्रांतीकारकांचे योगदान | 21–22 |
| 9 | कोरोना काळातील माझा अनुभव | 23–24 |
| 10 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | 25 |
| 11 | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात क्रांतीकारकांचे योगदान | 26–29 |
| 12 | आझादी और मेरे विचार | 30 |
| 13 | स्वतंत्रता / आजादी | 31 |
| 14 | 1857 First Independent of India | 32-33 |
| 15 | Work Revolution | 34 |
| 16 | Difficult Times | 34 |
| 17 | New Normal Norms | 35 |
| 18 | Lesson for Life | 35 |
| 19 | What a Change | 36 |
| 20 | महाविद्यालयीन ग्रंथालय | 37–39 |
| 21 | सांस्कृतिक अहवाल 2020–21–22 | 40 |
| 22 | PHYSICAL EDUCATION & SPORTS SCIENCES | 41-42 |
| 23 | NSS ACTIVITIES | 43-44 |
| 24 | Result 2020-21 | 45 |
| 25 | RESULT 2021-22 | 46 |

# युगप्रवर्तक
# स्वामी विवेकानंद

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवती भारत ।

अभ्युत्वानमधर्मस्य तदात्मान् सृज्याम्यहम ।।

जेव्हा जेव्हा भारत देशावर परकीय सत्तांचे आक्रमण झाले तेव्हा तेव्हा त्यांचा नायनाट करण्यासाठी या भारत मातेच्या धरतीवर थोर हुतात्मे व राष्ट्रपुरूषानी जन्म घेतला. या थोर पुरुषांपैकी पारतंत्र्याच्या शृंखलांनी बंदिस्त झालेल्या भारतीय जनतेच्या मनात भारतीय धर्म, संस्कृती, आचारविचार व परंपरा याविषयी दीप प्रज्वलित करणारे, मरगळलेल्या भारतीयांच्या नसा-नसात चैतन्य निर्माण करणारे, त्यांना स्वदेश, स्वधर्म व सत्याची जाणीव करुन देणारे, दारिद्र्य व अज्ञानाच्या महानिद्रेतून भारतीयांना जागे करणारे एक कर्मयोगी व संन्याशी म्हणजे स्वामी विवेकानंद होय. अशा या युग पुरुषाचा जन्म १३ जाने.१८६३ रोजी झाला. कधी कोठे कडीमाणसे साखर झोपेतुन उठली होती, तर कुठे पक्षांचा किलकिलाट सुरु झाला. अशा शुभमुहूर्तावर भास्कराच्या तेजस्वी किरण रुपाने नरेंद्राने जन्म घेतला. विवेकानंदजीचे पूर्ण नांव नरेंद्र दत्त होते. विवेकानंदचे माता-पिता आध्यात्मिक विचाराचे होते. आई कालीमातेची पिढी उपासक होती. त्यामुळे घरच्या आध्यत्मिक बिजरूपी वातावरणाने त्याचे सुंदर असे रोपटे फुलले. विवेकानंद हे लहानपणापासून अतिशय हुशार व कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांचे बालपण अतिशय आनंदात गेले. संगती, गायन, खेळ, व्यायाम अशा विविध क्षेत्रामध्ये त्यांनी आपल्या पावलाचे ठसे उमटवले होते.

जीवनाचे अंतिम ध्येय काय? माणूस जगतो तर कशासाठी, या विविध जीवनाच्या दृष्टीविषयी त्यांचे मन व्याकूळ झाले व त्यांनी संसाररूपी जीवनापासून संन्यास घेतला. नंतर त्यांनी भारत भ्रमण केले. भारतातील विविध व्यक्तिशी यांनी तत्वज्ञान व अध्यात्मिक विषयावर विचार केले. आपल्या तत्वज्ञानाविषयी अध्ययन केले.

रामकृष्ण परमहंसाच्या आशीर्वादाने १८५३ मध्ये अमेरिकेतील शिकागो येथे भरलेल्या जागतिक सर्वधर्म परिषदेत ते जातीने उपस्थित राहिले. हिंदू धर्माचे जगामध्ये पुनरुज्जीवन केले. स्वामी विवेकानंद म्हणत. ''आम्ही तुमच्या चरणापाशी बसतो, तुम्ही आम्हाला विज्ञान सांगा. तुम्ही आमच्या जवळ या आम्ही तुम्हाला धर्म सांगतो.'' अशा प्रकारची शिकागोची परिषद संपल्यानंतर त्यांनी इंग्लंड, मलेशिया देशामध्ये जावून आपल्या तत्वज्ञानाची बीजे रोवली.

"Don't try to bacome a man of success but try to become a man of value." **यामुळे ते युवकांचे आदर्श बनले. ते युवकांना सांगत, तुम्ही या धरतीचे अधिकारी, तुम्ही बलाढ्य, शूरवीर तुमचा जन्म लढण्यासाठी झाला आहे. तुम्ही धैर्याने पुढे येवून संकटाचा सामना करा, असा संदेश त्यांनी युवकांना दिला. स्वामी विवेकांनद बोलके व्यक्ती नव्हते तर कर्तेसुधाकर होते. ''केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे'' या उक्तीप्रमाणे त्याचे कार्य आपल्याला दिसून येते. त्यांनी मरगळलेल्या हिंदू धर्माला पर्यायाने भारतीयामध्ये नवे चैतन्य निर्माण करुन भ्रामक समजुती दूर केल्या. ते स्वतः म्हणत ''विश्वरुप पाहण्यापेक्षा प्रथम स्वरुप पहावे'' त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन उदात्त होता. व्यक्तीने आपल्या ठिकाणी संकूचितपणा न ठेवता कोणत्याही गोष्टीकडे चिकित्सकपणे पाहण्याचा व्यापक दृष्टीकोन जोपासला पाहिजे. ही धारणा या मागे होती.**

**शिक्षण म्हणजे शारीरिक, बौद्धिक, आध्यात्मिक बाबीचा अविष्कार होय. असे शिक्षणाविषयी त्यांचे दूरदृष्टी पूर्ण विचार होते. विद्यार्थ्यांनी बलोपासना करून ब्रह्मधर्माचे पालन करुन शिक्षण ध्यावे. परंतु आधुनिक स्थिती फार वेगळी आहे. आज जरी विज्ञानाने प्रगतीचे शिखर गाठले तरी त्यांचे काही वाईट परिणाम आजच्या नवजात तरुणावर प्रकर्षाने जाणवते. आजचा तरुण अंधारामध्ये भरकटला आहे. त्याला योग्य अशा प्रकाशमय रस्त्याची आवश्यकता आहे. म्हणूनच हजारो वर्षानी स्वामी जीप्रमाणे महापुरुष या धरतीवर जन्म घेवून आपल्या कर्माची सुमने लोकांच्या हृद्यामध्ये फुलवून जातात. शेवटी त्यांच्याविषयी एकच सांगावेसे वाटते की,**

*'' होऊनही गेले अधिकारी होतील*
*महान आत्मे या जगतात।*
*परी न झाले न होणार*
*दुसरे विवेकानंद या भारतात ''*

**कु. प्रतिक कठाळे**
**बी.ए. १**

# कोविड -१९ महामारीमुळे भविष्यात होणारा परिणाम

कोविड – १९ महामारीमुळे जगासमोर अभुतपूर्व संकट निर्माण केले आहे. हे संकट अनेक पातळ्यावर आहे. वैद्यकीय, आर्थिक, सामाजिक, मानसिक अशा विविध पातळ्यावर मानवजातीसमोर संकट उभे राहिले आहे. कोविड–१९ महामारीचा प्रसार रोखण्यासाठी बहुतांश देशानी लॉकडाऊनची उपाययोजना केली आहे. मात्र लॉकडाऊनमुळे जागतिक अर्थव्यवस्थेला मोठा फटका बसला आहे. उद्योग, व्यवसाय ठप्प झाले आहेत. आर्थिक व्यवहारच थांबल्यामुळे त्याचा विपरीत परिणाम मनुष्यबळावर झाला आहे.

हे सारे पाहुन १९६३ साली अल्फ्रेड हिचकॉक यांची उत्कृष्ट निर्मिती असलेल्या 'बर्डस' या चित्रपटाची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. या चित्रपटात अशीच काळजी, चिंता आणि भयावह अनुभवाची आठवण होते. सतत होणाऱ्या पक्ष्यांच्या हल्ल्यानंतर बोदेगा बेटावर संपूर्ण लॉकडाऊन करण्यात आले होते. सगळं काही ठप्प झाले होते. सगळीकडे अक्षरशः खळबळ माजली होती. मात्र यावेळी पक्षी नव्हे; तर एक जीवघेणा व्हायरस (विषाणु) आहे. मात्र, चिंता, काळजी, भीती आणि लॉकडाऊन यामध्ये साम्य दिसुन येते.

आज बहुतांश देशाचे आर्थिक व्यवहार ठप्प झालेले दिसून येत आहे. जगात आतापर्यंत दोन महायुद्धे अनुभवलेली आहेत. परंतु या महायुद्धाची झळ काही देशांना लागलीच नव्हती. आलेल्या महामारीमुळे संपुर्ण जग भयभीत झालं आहे. सर्वशक्तिमान व विकसित समजल्या जाणाऱ्या अमेरिका आणि युरोपीयन देशांनी या महामारीसमोर हात टेकले आहेत. जागतिक अर्थव्यवस्थेचे महायुद्धामुळे जेवढे नुकसान होणार नाही. त्यापेक्षा अधिक नुकसान या महामारीमुळे होईल असे मत तज्ञांनी व्यक्त केले आहे.

कोरोनामुळे संपूर्ण जग महामंदीत लोटले जात आहेत. जागतिक बँक आणि जगातल्या इतर संस्थाच्या अहवालाद्वारे अस दिसून येतय की भविष्यामध्ये संपूर्ण जगाला काही अडचणीना सामोर जावं लागणार आहे. कोरोना विषाणुमुळे जागतिक आणि देशांतर्गत अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामवर विवेचन करण्याचा प्रयत्न केला आहे. आरोग्य सेवेवर मोठा निधी खर्च होणे अपेक्षित आहे. या कामात जर निधी कमी पाडला तर इतर विकासकामांना कात्री लावून तो निधी आरोग्य व इतर अत्यावश्यक

सेवेवर खर्च करण्यात येईल यात काही शंका नाही. यामुळे देशातील विकासकामे नियोजनप्रमाणे पूर्ण होणार नाहीत. याचा परिणाम रोजगार उपलब्धीवर नक्कीच होणार आहे. जागतिक उत्पादन, सेवा व्यवस्था मोठ्या प्रमाणावर ठप्प झाली आहे. त्यामुळे बहुतांश देशामध्ये कामगारांना रोजगार मिळणार नाही. काही तज्ञांच्या मते बेकारीचे प्रमाण सुमोर ३०% जाणार आहे.

देशातील टाळेबंदीमुळे विविध उद्योग मोठ्या प्रमाणावर बाधित होणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने ब बांधकाम, व्यवसाय, पर्यटन, उद्योग, माहिती तंत्रज्ञन क्षेत्र आणि या सर्व व्यवसायावर अवलंबून असणारे , इतर छोटे–मोठे उद्योग व सेवा क्षेत्र मोठ्या प्रमाणावर बाधित होणार आहेत. मंदीच्या भीतीने शेअर मार्केट देखील खाली आलेले दिसून येत आहे. आज शेअर बाजारातील किंमती ३०% ते ५०% पर्यंत घसरल्याचे दिसुन येत आहे. वरील सर्व घटकांचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्थोवर खूप मोठा ताण येणार असुन त्याचा परिणाम नागरिकांच्या दैनंदिन जीवनावर झालेला पहावयास मिळणार आहे. देशाच्या पंतप्रधानानी आवाहन केल्याप्रमाण देशाची अर्थव्यवस्था ३ ट्रिलियन डॉलरवरून ५ ट्रिलियन डॉलरवर नेण्यासाठी वेळ लागणार नाही.

आतापर्यंत ६३ देशामधील आकडेवारीचा अभ्यास केला गेला आहे. यातून असे दिसून आले आहे की कोविड – १९ संकटामुळे, बेरोजगारीमुळे होणाऱ्या आत्महत्येच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. बेरोजगारीमुळे होणाऱ्या आत्महत्या होण्याची शक्यतेत किंवा जोखमीत आधीच्या तुलनेत २० ते ३०% वाढ झालेली आहे. दरवर्षी जगभरातून साधारणपणे ८ लाख लोक आत्महत्या करतात. हा अभ्यास करताना विविध वयोगट, लिंग, बेरोजगारी इ. घटकांच्या आधारे विश्लेषण करण्यात आले आहे. १८ मार्च २०२० च्या आपल्या प्रसिद्धीपत्रकात इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशनने (आयएलओ) बेरोजगारी संदर्भातील आकडेवारी आणि अंदाज व्यक्त केले आहे. २.४७ कोटी रोजगार आणि तशी परिस्थिती मर्यादित राहिल्यास ५३ लाख रोजगार जण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. जगभरातील आर्थिक परिस्थिती गंभीर होत गेल्यास बेरोजगारीच्या दरात ४.९३% ते ५.६४% वाढ होण्याची शक्यता आहे.

लॉकडाऊन सुरू झाल्यापासून आयटीयन्सविषयी दररोज नवनवीन बातम्या येताहेत. तसेच आयटी क्षेत्राला मोठा फटका बसलाय. याआधी ४% पर्यंत असलेले हे प्रमाण लॉकडाऊनमध्ये १५% पर्यंत गेल्या आयटीयन्सने आतापर्यत कधीही अनुभवली नसेल. अशा परिस्थितीचा सामाना त्यांना करावा लागतोय. सध्या निर्माण झालेल्या स्थितीमध्ये नोकरी गमावल्यानंतर मनावर येणाऱ्या ताणाच्या स्थितीमुळे चिंतारोगामध्ये भर पडत आहे.

जग अतिशय वेगाने जागतिक मंदीच्या दिशेने वाटचाल करत आहे. जगभरात परसलेल्या कोविड-१९ महामारीमुळे किमान पुढील काही महिने जागतिक अर्थव्यवस्थेचा बराच मोठा भाग ठप्प राहील. बँकिंग क्षेत्रावरही निश्चितच संकट उद्‌भवू शकते. कच्च्या मालाच्या आयातीवर अवलंबून असणाऱ्या क्षेत्रावर आयात थांबवावी लागल्याने उत्पादन बंद करण्याची वेळ येणार आहे. सर्वांत महत्वाचे म्हणजे, देशातील परकीय चलन साठ्यावर विपरीत परिणाम होणार आहे.

जागतिक स्तरावर अन्न व कृषी संघटनेला मागणी व अन्नपुरवठा ह्यात बदलांची अपेक्षा आहे. देशातील नागरिकांचे उपासमार आणि कुपोषण यांपासून संरक्षण, याचबरोबर अन्नपुरवठा साखळीतील त्रुटी दूर न केल्यास 'जागतिक अन्नसंकट उद्‌भवू शकण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे. कोविड-१९ हे संकट जगभरात 'अन्नटंचाई' निर्माण करू शकते असा इशारा संयुक्त राष्ट्रांनी दिला आहे. जगातील तिसऱ्या क्रमांकावरील तांदुळ निर्यातदार देश असणाऱ्या व्हिएतनामने निर्यात थांबवली आहे. त्यामुळे जागतिक तांदळाच्या निर्यातीत १५ % नी घट होऊ शकते. उत्तर आफ्रिकेचा सर्वात मोठा गहु पुरवठादार असणाऱ्या रशियाकडूनही निर्यातीवर निर्बंध लादले जाण्याची शक्यता आहे. तेलाच्या घसरलेल्या किंमती आणि देशभरात वाहन चालवण्याच्या घटत्या प्रमाणामुळे इथेनॉलची मागणी कमी झाली आहे. दुधाच्या आयातदार देशापैकी चीन हा एक मोठा आणि महत्वाचा आयातदार देश आहे. रबोबँकेच्या मते २०२० मध्ये चीनची दुधाची आयात १९ % घटण्याची शक्यता आहे.

जग जेव्हा महामारीच्या संकटातून बाहेर येईल तेव्हा विविध आव्हाने समोर उभी राहिलेली आपणास दिसून येतील.

**सादिक चाँदसाहेब शेख**
**पुणे**

# कोविड -१९ महामारीमुळे मानवांच्या जिवनशैलीवर होणारा परिणाम

कोविड – १९ च्या या महामारीमुळे संपूर्ण जगामध्ये थैमान घातलेलं या महामारीमुळे संपुर्ण जनतेमध्ये एक वेगळीच प्रकारची निराशा लोकांच्या मनामध्ये निर्माण झालेलं दिसून येत आहे. या महामारीमुळे भविष्यात मानवी समाजाला तसेच, विश्वामध्ये असलेलं सर्व जिवजंतु यांना हाणी निर्माण होण्याची दाढ शक्यता दिसुन येत आहे. जसे, वन्यप्राणी सध्या आन्नाच्या शोधामध्ये आसपासच्या खेड्यापाड्यात जावुन आपली भुक भागवत आहेत. हीच भुक भविष्यात जनतेला भोगावी लागेल. आपल्या या भारत देशामध्ये कोरोनाच्या महानारीच्या संकटातुन बाहेर आलेल्यांची आकडेवारी बरी समाधानकारक असली तरी, या महामारीमुळे होत असलेल्या जनतेची दिवसेंदिवस संख्येमध्ये वाढ ही होतचं आहे.

कोरोनाचा प्रसार हा केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील १९० हुन अधिक देश कोरोनामुळे प्रभावित झाले आहेत. भारतातील हजारों/लाखों मजुर हे स्थलांतरित होत आहेत. भविष्यामध्ये त्यांना रोजगाराच्या संधी कमी होण्याची शक्यता आहे. कारण, गावामध्ये कोरोनामुळे वाढती लोकसंख्या आणि रोजगाराचे कामे कमी असल्यामुळे भविष्यात अन्नाच, पैशाचा, शिक्षणाचा, जिवनावश्यक/अत्यावश्यक वस्तुचा तुटवडा हा भासण्याची शक्यता दिसून येत आहे.

भारत देशाला पुढे कोरोना संकटामध्ये झालेली हानी भरून काढण्यासाठी करवाढ ही करावी लागेल. आणि या करवाढीत अति सामान्य जनता हा बळी पडण्याची शक्यता आहे. सध्या या कोरोना कालावधीमध्ये प्रत्येक खेड्यापाड्यात नागरिकांना जिवनावश्यक वस्तुमध्ये करवाढ करून विक्री करत आहेत. आणि भविष्यात हीच प्रथा चालण्याची ज्ञात होत आहे.

कोरोनाच्या संकटामुळे कित्येक लोकांच्या नोकऱ्या ह्या गमावाव्या लागल्या. आपल्यामुळे ९०% टक्के नोकऱ्या या असंघटित क्षेत्रात आहेत; अगदी रिक्षवाला, हातगाडीवाला, हॉटेलवाला, गॅरेजवाला, न्हावी, मॉलमध्ये काम करणारे तरुण–तरुणी, अर्धकुशल, अकुशल कामगार आशा हातावर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरोनामुळे तर संक्रांत आली आहे. भविष्यात यांना गुलामशाहीमध्येच जगाव लागेल.

राज्याची लोकसंख्या ही १२ कोटीच्या जवळपास आहे. यातील १, २ कोटी लोकांनी जरी एक वेळेस चहा नाही घेतला तर त्या चहावाल्याला खुप मोठा प्रमाणात आर्थिक संकट कोसळण्याची

शक्यता आहे. आणि या संकटामुळे तो/ती उद्योगपती मानसिक ताण-तणावामध्ये जाण्याची शक्यता आहे.

या कोरोनामुळे शैक्षणिक स्तरावर विचार केला तर, online classes हे घ्यावे लागत आहे. या पर्यायामुळे विद्यार्थ्याची शिकण्याची आवड ही नाहिसा होत चाललेली दिसुन येत आहे. या online classes च्या माध्यमातुन विद्यार्थ्यापर्यंत फक्त Theory पोहचेल. Practice हे online मुळे जास्ती प्रभावी आकलन हे होणार नाही.

online classes मुळे आजही कित्येक आदिवासी ग्रामीण भाग ही शिक्षणापासुन वंचित आहे. कारण त्यांच्याकडे कसल्याही प्रकारचे signle नाही. उलट हीच मुल पूर्वी शाळेमध्ये/कॉलेजमध्ये सतत जाण्यास आळसीपणा करायचे. मग हे तरी डोळ्याआड online classes या प्रक्रियेत सहभागी होणाऱ्याची टक्केवारी कमी दिसून येण्याची शक्यता आहे.

**अशिष मारूतीराव पाटील**

---

# लय विषारी

पहिला महापूर
नंतर महामारी
हे ट्वेन्टी - ट्वेन्टी
लय विषारी !

कोरोना काय जास्त
टिकणार नाय, पण
जग ट्वेन्टी - ट्वेन्टी
विसरणार नाय !

महापुरात सगळं वाहून गेलं
महामारीत सगळं राहून गेलं
ट्वेन्टी - ट्वेन्टी मात्र
लक्षात राहील !

महापुरात घराबाहेर पडलो
महामारीत घरातच राहिलो
या ट्वेन्टी - ट्वेन्टी कडून
खूप काही शिकलो ।

या ट्वेन्टी - ट्वेन्टी च्या मॅच मध्ये
या संकटांच्या सीरिजमध्ये
डॉक्टर मॅन ऑफ द मॅच आणि
पेलीस मॅन ऑफ द सिरीज !

**साधना सौंदडकर**
बी.ए.भाग २

# कोरोना-सामाजिक व आर्थिक परिणाम

सध्या चीनसह संपूर्ण जगाला कोरोना विषाणूने विळखा घातला आहे. याची उत्पत्ती, प्रभाव, फैलाव, लक्षणे आणि बचावाच्या पद्धती यावरून सर्वत्र चर्चा आणि वादविवाद सुरू असून या समान शत्रूविरोधात प्रत्येकजण उभा राहताना दिसतोय. डॉक्टरांच्या मतांतही खाण्याच्या सवयी बदला यापासून तर मास्क वापरण्याची गरज आहे किंवा नाही इथवर मतमतांतरे दिसतात. या गोंधळात सामान्य जनता मात्र रोजच्या व्यवहारात गोंधळलेली आणि धास्तावलेलीच अधिक दिसते. वास्तविक कोरोना वायरस नवा नाही. काही वर्षांपूर्वी आलेला सार्स रोगही कोरोनाचाच एक प्रकार होता. मात्र कोविड – १९ नावाच्या नव्या विषाणूच्या फैलावाने या सर्वांवर मात करत जगात धुमाकूळ घातला आहे. डिसेंबर जानेवारीत चीनच्या वुहान प्रांतात पहिल्यांदा आढळून आल्यानंतर अल्पकाळात त्याचा प्रभाव जगभर वाढत चाललय. जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) ताज्या अहवालानुसार आतापर्यंत ११० पेक्षा अधिक देशांमध्ये कोरोनाने हातपाय पसरवले असून जगभरात १ लाख २५ हजार पेक्षा जास्त लोकांना या आजाराची लागण झाली आहे तर ४ हजार सहाशे पेक्षा अधिक लोक मृत्यूमुखी पडले आहेत. भारतातही दोघांचा मृत्यू झाला असून लागण झालेल्या रुग्णांची संख्या सातत्याने वाढत आहे.

**अर्थव्यवस्थेला हादरा :**

आरोग्याच्या दृष्टीने कोरोनाकडे पाहणे महत्वाचे आहेच पण या वायरसचे अर्थकारणावर होणारे परिणाम ही अतिशय तीव्र आहेत. या आजारामुळे जागतिक अर्थव्यस्थेवर होणारा परिणाम आता स्थानिक पातळीवर ठळवपणे दिसू लागलाय. जागतिक व्यापाराची पुरवठा साखळीच (सप्लाय चैन) विस्कळीत करून या विषाणूने जागतिक अर्थव्यवस्थेला जेरीस आणले, असेच म्हणावे लागेल. सुमारे १५ अब्ज डॉलर्सचा फटका केवळ कोरोनामुळे जागतिक अर्थव्यवस्थेला बसलाय आणि यापुढेही तो वाढतच जाणार आहे.

तेल उत्पादक (OPEC) देश, रशिया व अमेरिका यांच्यात सुरु झालेल्या तेलयुद्धाचा अन्य देशांना फायदा होईल की नाही आणि तो ग्राहकांपर्यंत पोचेल की नाही हा प्रश्न मात्र अद्याप अनुत्तरित आहे. या देशांतील व्यापार युद्धामुळे आणि एकूणच मंदीमुळे तेलाची मागणी मात्र कमी झाल्याने सरकारने ठरवले तर त्याचा फायदा आपल्यासारख्या तेल आयात करणाऱ्या देशांना होऊ शकतो. इंटरनेट व तंत्रज्ञानामुळे व्यावसायिकदृष्ट्या जग हे खूप छोटे झाले आहे. विकसित देशांना सेवा पुरवणाऱ्या आयटी कंपन्यांची जागतिक पातळीवरची देवघेव इतकी वाढली आहे की एका देशातील उद्योग बंद पडताच दुसऱ्या देशाला त्याचा लगेच फटका बसतो.

देशातील वाहन उद्योगही अडचणीत आहे. चीनमधून भारतात येणाऱ्या गांड्यांचे सुटे भाग व औषधांसाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध होत नसल्याने त्याचा औषध व वाहन उद्योगांवर विपरीत परिणाम झाला आहे. आपल्याकडील पर्यटन व वाहतुक क्षेत्र मंदीच्या सावटाखाली आहे. तीर्थक्षेत्र, खाण्याच्या जागा, शॉपिंग मॉल  तसेच गर्दीच्या जागा ओस पडताना दिसतात. कृषी क्षेत्रालाही मोठा फटका या कोरोनामुळे बसला आहे. कांद्याला मिळणारा भाव कमी होत असताना पालेभाज्या आणि फळांची मागणीही घटलीय. देशातून मासे आणि कोळंबीचीही मोठ्या प्रमाणात निर्यात होते. कोरोनासंदर्भात पसरलेल्या अफवांचा सर्वांत मोठा फटका पोल्ट्री व्यवसायाला बसलाय. या व्यवसायाला दरमहा तब्बल ४०० कोटी रुपयांचा फटका सहन करावा लागतोय. चिकनचा भाव अगदी १० रू. प्रती किलोपर्यंत खाली आला तर पोल्ट्रीशी संबंधित इतर पूरक उद्योंगावरही याचा विपरीत परिणाम झाला आहे. खाद्य निर्मिती करणाऱ्या कंपन्यांनी खरेदी थांबवल्यामुळे मका व सोयाबीन सारखी पिके घेणारे शेतकरीही अडचणीत आले आहेत. केवळ महाराष्ट्रात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या पोल्ट्री व्यवसायावर अवलंबून असलेल्या सुमारे १० लाख लोकांना याची झळ सोसावी लागत आहे. देशाला वाचवणाऱ्या कृषी क्षेत्राला बसणारा फटका लक्षात घेऊन दररोज कोट्यावधी रुपयांचे नुकसान घडवून आणणाऱ्या पोल्ट्री सारख्या अनेक उद्योगांसाठी सरकारने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

**निर्यातीला फटाका :**

कोरानाचा पहिला फटका बसला तो निर्यातीला अनेक देशांची निर्यात ठप्प झाली आहे. आपल्याकडील आंबा, द्राक्ष, निर्यातदार शेतकऱ्यांपासून आणि कामगारांपासून तर उद्योजकांपर्यंत सगळेच हवालदिल झाले आहेत. ग्लोबल इकॉनॉमीमध्ये प्रत्येक देश सध्या दुसऱ्या देशावर अवलंबून आहे. त्यामुळे या प्रश्नांची दाहकता अधिक वाढते. अनेक उद्योग बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. औषध कंपन्यांचाही तीच गत आहे. ई-कॉमर्समध्ये घटलेली मागणी व केवळ एक चालक बाधित झाल्याने कॅब कंपनीवर आलेले दडपण असच चालू राहिल्यास येत्या काळात या गोष्टी भयावह स्वरुप धारण करतील अशी शक्यता आहे. कापड, यंत्रमाग, छोट्या-मोठ्या इंजिनिअरिंग इंडस्ट्रीज, आयटी सर्व्हिसेस या सर्वच उद्योगांना त्याची जबर किंमत मोजावी लागू शकते.

असंघटित क्षेत्राला तडाखा :

आपल्याकडे ९० टक्के नोकऱ्या या असंघटित क्षेत्रांत आहेत. अगदी रिक्षावाला, हातगाडीवाला, टॅक्सीवाले, रस्त्यावरचे खेळणी विक्रेते, चहावाले यापासून तर वेटर, गॅरेजवाले, मॉल मधील तरुण-तरुणी, कागद-काच-भंगार- जमा करणारे, बांधकाम क्षेत्रात काम करणारे मंजूर,

अर्धकुशल, अकुशल कामगार अशा हातावर पोट असलेल्या लोकांच्या रोजगारावर कोरोनामुळे संक्रांत आली आहे. नोटबंदीच्या तडाख्याने घायाळ झालेल्या अर्थव्यवस्थेतील हे घटक आता कुठेतरी कसंबसं सावरत असताना अचानक कोरोनाचे संकट कोसळले. साधे चहाचे उहदारण घेता येईल. राज्याची लोकसंख्या बारा कोटीच्या घरात आहे. यापैकी अवघ्या एक कोटी लोकांनी जरी एका वेळेस हॉटेलमध्ये चहा घेणे सोडले आणि दहा रूपाला एक चहा याप्रमाणे हिशेब केला  तर महिन्याला ३०० कोटी रूपयांचा फटका केवळ चहावाल्यांना बसणार आहे. त्यातही मुळातच हातावर पोट असलेल्या या वर्गांकडून बचत केली जात नाही. शिल्लक काही उरतच नसल्यामुळे बचत करणार तरी कशी? अशातच कोरोनाची स्थिती आणखी एक-दोन महिने कायम राहिली तर या वर्गाचं जगणं कठीण होणार आहे. अशा परिस्थितीत पोटाची खळगी भरण्यासाठी अनेक कुटूंब सावकारांकडून अव्वाच्या सव्वा व्याज दराने पैसे घेऊन ते कर्जाच्या दृष्टचक्रात अडकण्याचीही शक्यता आहे. अनेकांनी बँकांकडून कर्ज घेऊन वाहने खरेदी केली आहेत. पण कोरोनाचा वाहतूक क्षेत्रावरही परिणाम झाल्यामुळे भविष्यात वाहन कर्जाचा हप्ता थकल्यास बँकाचाही एनपीए वाढणार आहे. परिणामी त्याचा रियल इस्टेट व इतर क्षेत्रामध्ये नकारात्मक परिणाम होऊ शकतो. मल्टिप्लेक्स बंद आहेत. त्यामुळे या व्यवसायावर अवलंबून असलेले तसेच नाट्यक्षेत्रातील कलाकार आणि पडद्यामागे काम करणारे कामगार यांच्या उत्पन्नावरही गदा येणार आहे. या सर्व बाबींकडेही लक्ष देण्याची गरज आहे.

**बेकारी :**

सध्या राज्यात आणि एकूणच देशभरात बेकारीने कळस गाठला आहे. त्यातच कोरोनामुळे आणखी वाढ होण्याची भीती आहे. त्यामुळे याचाही लगेचच अभ्यास करून कोणत्या उद्योगावर काय परिणाम होईल आणि त्यासाठी काय उपाययोजना कराव्या लागतील याचाही विचार करावा लागणार आहे. त्याची सुरूवात संवादापासून होऊ शकते. त्यासाठी छोटे, मध्यम व मोठ्या व्यवसायिकांशी आणि त्यांच्या संघटनांशी लगेचच चर्चा सुरु केली तर त्यावर लवकर मार्ग शोधून काढणे शक्य होईल.

**मंदीत संधी :**

जग आर्थिक मंदीच्या तडाख्यात सापडण्याची शक्यता असतानाच टॉम ओरिकसारखे जागतिक अर्थतज्ञ मात्र याला विकसनशील देशांसाठीची सुवर्णसंधी म्हणून पाहत आहेत. भारतासारख्या विकसनशील अर्थव्यवस्थेसाठी प्रगतीची दारे उघडणारा काळ म्हणूनही या रोगाकडे पाहिलं जातयं. कधी कधी वाईटातूनही चांगले घडत असते. त्याचप्रमाणे कोरोनाच्या संकटातून संधीही

निर्माण होऊ शकतात. फक्त त्या शोधण्याची आणि त्याला मूर्त रूप देण्याचं व्हीजन आणि तत्परता राज्यकर्त्यांकडे असावी लागते. आपल्याकडील राज्यकर्ते तशी तत्परता दाखवतील. अशी आशा करायला हरकत नाही. उदाहरणच द्यायचे झाले. तर चीनमध्ये कार्यरत असलेल्या किंवा आपल्या उद्योगाचा विस्तार चीनमध्ये करणाऱ्या ऑटोमोबाईल कंपन्यांना आपल्याकडे वळवण्यासाठी एस आय डी सी आणि राज्य सरकारने वेळीच पावले उचलली पाहिजेत. यापूर्वीचा सार्स किंवा आताच्या कोरोनामुळे चीनमध्ये जाण्यास या कंपन्या धास्तावल्या आहेत. त्यांना आपल्याकडे आवश्यक त्या सुविधा निर्माण करून दिल्या तर आपल्याकडची बेकारी कमी होऊन तरुणांच्या हातालाही काम मिळेल.

चीनपासून धास्तावलेल्या व पर्यायी उत्पन्नाच्या शोधात असणाऱ्या उद्योगांना भारत व विशेषतः महाराष्ट्र हा एक सुरक्षित पर्याय होऊ शकतो. यामुळे गलितगात्र झालेल्या आपल्या अर्थव्यवस्थेलाही नवसंजीवनी मिळू शकेल. पण त्यासाठी केंद्र व राज्य सरकारने पुढाकार घेऊन करसवलती व अन्य शक्य त्या उपाययोजना त्वरेने करणे आवश्यक आहे. तसेच अर्थतज्ज्ञांची समिती नेमून येत्या काही वर्षात कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे उद्योगांवर होणाऱ्या अल्प व दीर्घकालीन परिणामांचा अभ्यास करून वेळीच योग्य ती पावलेही उचलली पाहिजेत.

**नविन कार्यपद्धतीचा उदय :**

एकमेकांशी येणाऱ्या जवळच्या संबंधांमुळे कोरोनाचा वेगाने प्रसार होतो. म्हणून राज्य सरकारने शाळा महाविद्यालये, मॉल, थिएटर बंद केले आहेत. काही कंपन्यांनीही कार्यालयात न येता घरुन काम कारण्याची (वर्क फ्रॉम होम) मुभा दिली आहे. यातून एक नवी कार्यप्रणालीही उदयास होऊ शकते. याचा भविष्यात काय परिणाम होईल हे आताच सांगणे कठीण असले तरी अर्थव्यवस्थेवर याचा थेट परिणाम होईल, हे मात्र नक्की !

शेवटी व्यक्तिगत स्वच्छता आणि आवश्यक ती दक्षता घेतली तर हा रोग नियंत्रणात राहील मात्र या रोगामुळे निर्माण झालेल्या अर्थसंकटातून देशाला सावरण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आखणे, हाच एकमेव प्रभावी मार्ग ठरेल.

**प्राची विजय वानखेडे**
ए जी डी बेंडाळे महिला
महाविद्यलय जळगाव
मो. 9307129712

# कोविड - १९ महामारीमुळे होणारे परिणाम

जगभर सगळीकडे जण मांडून बसलेले ‘कोरोना’ चे विषाणू कधी नाहीसे होतील आणि या विचित्रपणे पसरू शकणाऱ्या रोगाचा संपूर्ण जगावर भविष्यात कोणता परिणाम होईल? या विचाराने सध्या सर्वांनाच ग्रासले आहे. सर्वत्र टाळेबंदी असल्याने कारखाने बंद आहेत. जीवनावश्यक वस्तू आणि औषधे याखेरीज अन्य वस्तूंचा व्यापार ठप्प झालेला आहे. वाहतूक थांबलेली आहे. ही साथ केव्हा आटोक्यात येईल आणि थांबलेले व्यवहार पुन्हा कधी सुरळीत होतील याचा अंदाज कोणालाच येत नाही. या नव्या रोगाचे परिणाम अनेक बाजूंनी जगातील वेगवेगळ्या देशांवर होणार आहे.

कोविड – १९ या अतिसुक्ष्म विषाणूमुळे जगभरात झालेल्या या उलथापालथीचे हादरे येती काही वर्षे तरी जाणवणारच आहे. अर्थतज्ज्ञांनी तर आधीच जागतिक मंदीचा अंदाज वर्तविला आहे. तसेच जागतिकीकरणाची स्थितीही नाजूक आहे. खुल्या झालेल्या जगाच्या सीमा या कोरोना संकटाने पुन्हा बंद होण्याच्या शक्यता वाढल्या आहे. उद्या या विषाणूला रोखण्यात यश येईल. पण भविष्यात याचा विपरित परिणाम झाल्या वाचून राहणार नाही.

शैक्षणिक क्षेत्र, व्यावसायिक, अर्थव्यवस्था, रोजगाराच्या संधी यावर मोठा परिणाम झालेला दिसून येईल. ‘‘जग जिंकायला निघालेला, आज हताश झाला... अन् स्वतःच्याच घरात बंदीवान झाला....’’

या जागतिक महामारीचा उच्च शिक्षणावर दूरगामी परिणाम होणार आहे. इंजिनिअरिंग व आर्किटेक्चरसाठी प्रवेश परीक्षेस उशीर होणार आहे. आणि त्यास विलंब झाल्यास विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी लागणारी शैक्षणिक पात्रता आणि या संदर्भात शासकीय निर्णयांबद्दल विद्यार्थ्यांमध्ये संक्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. तसेच नोकरी गमावणे, वेतन कपात, टाळेबंदी, आर्थिक क्षमता कमी झाल्यामुळे शैक्षणिक कर्ज होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते.

विद्यार्थी आणि पालक कमी शुल्क अभ्यासक्रम, अल्प मुदतीचा अभ्यासक्रम आणि ऑनलाईन शिक्षण यांकडे गतिमान री स्किलींग पर्याय म्हणून अधिक लक्ष देऊ शकतात. शहराबाहेरील विद्यार्थ्यांना कोरोनाच्या धोक्यामुळे आणि न परवडणारे विकल्प असल्याने होस्टेल मधील प्रवेश कमी होऊ शकतात. पालक त्यांच्या मुलांना घरी राहून स्थानिक पातळीवर शिक्षण देण्यास प्राधान्य देतील. प्लेसमेंट मध्ये मोठी पातळी जाणवेल. परंतू विनामुल्य इंटर्नशिप वाढू शकेल.

कोरोनामुळे देशातील सर्व क्षेत्रे प्रभावित होत असून भारतीय सैन्याला यामुळे मोठा फटका बसला आहे. कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी भारतीय सैन्याने अधिकारी व जवानांची नियोजित निवड

प्रक्रिया अनिश्चित कालावधीसाठी स्थगित केली आहे. निवृत्त होणाऱ्यांची संख्या पुर्वीइतकीच असून स्वेच्छानिवृत्ती, शहीद अथवा सेवेत असताना मृत होण्याचे प्रमाण व विविध मोहिमांत जखमी होणाऱ्या जवानांच्या संख्यमुळे मोठ्या प्रमाणात ही तुट वाढत आहे. भविष्यात तूट भरून काढण्यास वेळ लागणार आहे. यातून देशाच्या सुरक्षिततेसंबंधी चिंता वाढत आहे.

निमलष्करी दलात कोरोनाचा मोठ्या प्रमाणावर झालेला प्रादूर्भाव चिंतेचा विषय आहे. भारतीय सेना या प्रादूर्भावापासून अजून लांब असली तरी कोरोनामुळे रखडत चाललेल्या निवड प्रक्रियेमुळे भविष्यात सैन्याच्या मोहिमांना याचा फटका असू शकतो. नियोजित मोहिमा पुढे ढकलल्या जाऊ शकतात. उत्पादनाची साखळी ठप्प झाली आहे. उद्योग आणि इतर क्षेत्रातही आर्थिक अडचण आली आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात याचे विपरित परिणाम जाणवू लागणार आहे. करिअरच्या उंबरठ्यावर असणारे तरूण चिंताग्रस्त अवस्थेत जाण्याची दाट शक्यता आहे.

जगाला ग्रासणाऱ्या कोरोना विषाणूपासून वाचवण्यासाठी माणूस एकमेकांपासून विलग होऊन बंदीवासात जातो आहे. पण त्याच्या या क्वारंटाईनचा पक्षी व प्राणी जगतावर मात्र चांगला परिणाम झाला आहे. पाणवठ्यांवरील त्यांच्या संख्येत वाढ तर होऊ लागलीच आहे. शिवाय काही दुर्मिळ पक्षी, प्राण्यांचेही तिथे दर्शन होऊ लागले आहे. नाण्याच्या असणाऱ्या दोन बाजूंप्रमाणे कोणत्याही परिस्थितीला सकारात्मक आणि नकारात्मक बाजू असतात. या महामारीमुळे गेल्या दोन अडीच महिन्यापासून समाजाला काटकसरीची, स्वच्छतेची अधिक सवय झाली आहे. याचा भविष्यात फायदा होणारच आहे. ''शेती नको, मला तर नोकरीच हवी आहे.'' असं म्हणणाऱ्या तरूण वर्गाला शेतीचे महत्व तर नक्कीच कळाले. कारण लॉकडाऊनच्या काळात सर्व उद्योग बंद पडले पण शेती मात्र सुरूच आहे.

दररोज आपण किती वायु, ध्वनी, जल प्रदुषण टाळू शकतो. हे कोरोना शिकून गेला. 'ओझोन' लेअर ला देखील भविष्यात याचा फायदा होईल. आजच्या परिस्थितीमध्ये अनेक विवाह झाले. याचा फायदा निश्चितच बळीराजाला आणि गरीब वर्गाला होणार आहे.

कायदे भरपूर असूनही ते तोडण्यासाठीच जणू आमची स्पर्धा असते. एखादी भिती किंवा संकटच आम्हाला योग्य मार्ग दाखवू शकतो. तो मार्ग या 'कोरोना' संकटाने आपल्याला दाखवून दिला आहे. अशाप्रकारे काही प्रमाणात चांगले तसेच वाईट परिणाम या महामारीमुळे भविष्यात पहायला मिळतील.

**कविता विजय महाडीक**
रा.बाबतरा, ता.बैजापूर,
जि.औरंगाबाद मो. 9284248384

# कोरोनातील अनुभव

कोरोना (कोविड – १९) नाव एकेल तरी मनात भीती निर्माण होते. कोरोना नाव आधी कधी ऐकल नव्हत. जेव्हा पासून ऐकल तेव्हापासून त्या नावाने मनात भिती निर्माण केली आहे. आजही नाव ऐकल तरी मनात भिती निर्माण होते.

कोरोना हा जगातील भयानक आजार ठरला. कोरोना मध्ये आलेले अनुभव फारच कष्टदायक आहेत. कोरोना विषाणू महामारीचा अवतार घेऊन आला आणि संपूर्ण जगात हाहाःकार माजला. कोरोना काळात चांगला आणि वाईट माणुसकी दोन्हीचे दर्शन झाले.

२३ मार्च २0२0 कोरोना व्हायरस २३ मार्च २0२0 पासून लॉकडाऊन सुरू झाले. काही कळायच्या आत लॉकडाऊन सुरू झाले. काय करावे काय करू नये, काही सूचत नव्हते. आधीच कोरोनाची भीती आणि त्यात हे लॉकडाऊन मनाचा पार गोंधळ उडाला. लॉकडाऊन म्हणजे नक्की काय होणार हे सुद्धा माहित नव्हत काय सुरु असणार काय बंद सामान कस आणायचे हा मोठा प्रश्‍न.

२0२0 मध्ये ज्या लोकांना कोरोना झाला किंवा ज्यांच्या मध्ये तशी लक्षणे आहेत. त्यांना १४ दिवसासाठी बंदिस्त करीत असत. आपल्या घरातील एखाद्या व्यक्तीला पण अस करू नये अस त्या वेळेस सर्वांना वाटत होत. परंतु ज्यांला कोरोना झाला त्यांना तिथे जाव लागत होत. आपल्या घरापासून लोकांपासून दूर राहाव लागत होते. ते दिवस आजही कुणी विसरू शकत नाही.

लॉकडाऊन मध्ये जी शांतता होती ती जीवघेणी होती. सर्व गाड्या बंद असल्यामुळे आवाज नव्हते पूर्ण शांतता होती. गाड्या बंद असल्यामुळे प्रदुषण कमी झालं. आवाजाच प्रदूषण कमी झाले. पंक्ष्यांचा किलबिलाट जास्त वाढला. तो सुमधुर होता.

कोरोनामुळे लोक एकमेंकापासून दुरावले गेले. मजूर लोकांचे खूप हाल झाले. सर्व काम बंद झाल्यामुळे त्यांना काही मिळत नव्हत त्यात ते गावाला जायला निघाले त्यात गाड्या बंद त्यामुळे ते तसेच चालत चालत निघाले. रस्त्यात खायला प्यायला नसल्याने लहान मुलांचे, बायकांचे फार हाल झाले. अशी परिस्थिती निर्माण झाली की लोकांना स्वतःचे प्राण गमवावे लागले. कोरोना आला आणि गेला पण हे दुःख भरून न निघणारे आहे.

कोरोना काळात काही डॉक्टर्स नी स्वतःचे दवाखाने बंद केले. हे फार धक्कादायक होत. एवढे पेशंट वाढत होते की दवाखाने कमी पडत होते. दवाखान्यामध्ये बेडस नव्हते. लोक खाली पडून होते. कुणाला दवाखान्यात जागा मिळाली नाहीतर ॲम्बुलेन्स मध्येच जीव सोडला. घरच्यांना शेवटच बघायला सुद्धा मिळाला नाही किंवा कोरोनाच्या भिती नी कुणी बघायला गेल नाही.

रात्री बेरात्री येणारा ॲम्बुलन्सचा आवाज आजही भिती देऊन जातो. ज्यांनी आपल्या लोकांना कोरोना काळात गमावल ते आजही ते दिवस विसरु शकत नाही. आजारापेक्षा आजाराच्या भितीनेच खूप लोक गेले.

कोरोनामध्ये माणस माणुसकी विसरले. कुणी कुणाशी बोलायला तयार नाही. अडअडचणी कुणी मदत करायला तयार नाही. जो तो संशयाने बघत होता. काहींनी तर घराचे दरवाजेच कायमचे बंद करून ठेवले.

या व्यतिरिक्त काही लोक होते जे या कठिण परिस्थितीत एकमेकांना मदत करत होते. गरिबांना अन्न देत होते. सर्व प्रकारची मदत करत होते. माणुसकी जपत होते.

कोरोना खूप काही शिकवूण गेला. काय चांगल काय वाईट सांगून गेला.

**कु. शितल ताकसांडे**
बी.ए. 5 सेमीस्टर

# कोरोनातील अनुभव

वारा गेला दिवस गेले, पानी गेला वाहुन कोरोना मुळे
शाळा सुटली घरं बुडली किती दिवस राहीले पाहना

सर्वे होती घरी बसून आणि सर्व कामे थांबून
देश थांबला प्रगती थांबली दुर्गती झाली

कामे नाही दाना नाही कर्ज गेले वाढून
विचारात होता कोरोना गेल्यावर कर्ज कसे फेडून

प्रार्थना होती देवाला आम्ही कसे कसे राहू
मानवाने हा रोग बनवीला काय मानवा वरच राहू

कोरोना गेला परिस्थिती गेली पुन्हा आले ते दिवस आता बघतो
शाळा सुटली फाटी फुटली कधी येणार ते सुट्टीचे दिवस

कोरोना गेला देश आला पुढे सर्वांचे भरले मनाचे धडे
देश चालला दुःख गेले समृद्धी आली आमच्याकडे

**तुषार हेमराज लांजेवार**
बी.ए. 1

# कोरोना (कोविड - १९) चा भारत पर होनेवाला परिणाम

*''शांत भरे मानव तल में, कैंसा अंहकार छाया हैं।*
*त्रास त्रास हैं जग जीवन जग में*
*बस कोरोना कि बरसात है।।*
*कोरोना के कहर ने यह प्रचण्ड मचाया हैं।*
*बच्चे बूढे जवान और किसान रोया है।।*
*बेबस है धरती, कि हालत सारा देश सोया है।*
*आओ सभी तैंयार हो जाये*
*कोरोना के खिलाफ अवाज उठाये ।।''*

''कोरोना को कोविड १९ नाम से भी जाना जाता है। जो चाइना देश से आयी गयी एक महामारी है। जो दूनिया के लिए एक संकट बन चुकी हैं।

आम तौर पर प्राणी जगत में पाये जाने वाला वायरस है जिसे हम कोविड–१९ के नाम से भी जाना जाता है। इसके पहले के मारीज चाइना के बुहान में मिले इसकी खोज चाइना के बुहान में (sea food) मार्केट से पता' चला कि यह प्राणियो से मनुष्यो में फैलने वाली महामारी हैं। पुरे विश्व में यह वायरस फैलता ही जा रहा हैं । इसका सक्रमण २८ से ज्यादा देशो में हुआ है।

''सबसे बडी संस्था स्वास्थ संस्था (WHO) ने इसे ग्लोबल हैल्थ इमरजेन्सी घोषित कर दिया है।''

कोरोना प्राणियों से मानव में फैलते हैं। और इंसानो से दूसरे इंसानो में बड़ी तेजी से फैल रहा है। कोरोना वायरस को कोविड – १९ कि महत्वपूर्ण भूमिका सम्पूर्ण विश्व के मानव जीवन पर बहुत ही गहरी छाया छोडती हैं । जो मनुष्य भविष्य को ही शायद कभी कोई भुला पायेगा।

एवं इससे न केवल मानव जाति को ऱ्हास हुआ बल्कि मानव शक्यता से जुडे सभी आर्थिक, राजनितिक एवं शिक्षा स्वास्थ्य साठा सम्पदा को हानि पहूँचाने में कोरोना वायरस का महत्वपूर्ण भूमिका रही हैं।

*''बहिष्कार करों अब नकली वस्तु लेना चीनो कि*
*चन्द पलो कि सासे हैं, इस धरति पर जीने कि*
*क्यों हम इतने स्वार्थो हो गये नयी नयी तकनीको से*
*न पैदा (सृजन) कर पाओगे जल और वायु अपने खून पसीनो से''*

''नयी दुनिया से नही आया है कोरोना।
यह मानव का ही जाल है।।
खुदा का कहर कहकर इंसान इससे मुहँ मोड़ रहा।
मानव निर्मित हाथियार मानव को ही तोड रहा।।''

मानव के आधुनिक विकास एवं नयी–नयी तकनीक के चलते हमारे वर्तमान के प्रकृति संतुलन पर बहुत ही बुरा प्रभाव पड़ा है। जिसके परिणाम वायु प्रदुषण, ग्लोबल वोर्मिंग, ध्वनि प्रदूषण जल प्रदूषण वनों का कहना वर्षा कि कमी, जिससे वन प्राणी पशुओं का जीवन असुरक्षित हो गया है।

प्रधानमंत्री झरा लगाये गये (लॉक डाऊन) के कारण मानव सभ्यता अपने घरो मे सिमट कर रह गयी है। जिसे कारण मनुष्यों से होने वाली प्राकृतिक छति को बहुत बड़ा फायदा हुआ है।

अ) शुद्ध हवा

ब) जल नदियों झीलों का साफ होना ।

क) वाहनो के न चलने से ध्वनी प्रदूषण में कमी

ड) मानव के अन्दर एकजुट कि भावना का विकास होतो।

इ) ध्रुवीकरण में कमी आना।

ई) पर्यावरण के प्रति उदार भाव

२०१९ में आयी कोरोना महामारी ने सम्पूर्ण विश्व के आर्थिक, राजनितिक, स्वास्थ एवं शिक्षा आंतरराष्ट्रीय व्यापार, आपसी राष्ट्रों के सम्बधों मानव सभ्यता पर बहुत ही गहरा असर छोड़ा है। जिसका परिणाम यह होगा कि विश्व कि सारी अर्थ व्यवस्था को बहुत ही बड़ा नुकसान होगा । जिसे उभरने में (१ से २) साल का समय लग सकता है।

जिसके परिणाम स्वरूप भारतीय (acconomy) बहुत ही नीचे चली जायेगी। भारत ७५% (Work barse) एवं सेल्फ (Self Employ) है। उनको बहुत बड़ा नुकसान है । इस महामारी के परिणाम स्वरूप भारत कि (उसे ४ करोड़ कि नौकरिया चली गयी है) एंव सैलरी में कटोती हैं । भारत मे पहले से ही अन्य समस्या मौजूद है जैसे

G.S.T
Credit
Unemployment

तीसरे दौर के प्रभाव से झटके से अर्थव्यवस्था बाकि हिस्सों तक पहुँचने कि संमभावना बढाऐंगी । श्रमिकों के वेतन मे कमी का सामना करना पड़ेगा और छटनी का सामना होने से बेरोजगारी अपने चरण सीमा पर होगी । इस महामारी के चलते भारत कि ५०% कंपनी जो कपड़े एवं जुते बनाती है। उन पर

बहुत ही गहरा प्रभाव पड़ा है। एवं भारत तथा अन्य देशों कि लेन देन प्रक्रिया पर भी इसके परिणाम देखने को मिलते है। भारत के कार्यरत – ९३% से अधिक श्रमिक जो बड़े पैमाने पर आधुनिक और अनौपचारिक क्षेत्रो में कार्यरत है । कोविड १९ के कहर के कारण सामाजिक कार्यो में लगे है। कोरोना कि वजह से जो भी लेवर है । वह राज्य छोड़की अपने राज्य जाने लगी जिसके परिणाम यह देखने को मिलते है कि वहाँ चल रहा काम धीमा हो गया है।

टी.व्ही. न्यूज चैनल, अखबार तथा विश्व आंतरराष्ट्रीय एमं संगठन हमें बताते है की यह २५ मिलिसन नौकरिया खा जायेगा । जिससे हमारे अंदर अभी डरकामाहोल बना हुआ है।

- कोविड १९ के कारण शेयर मार्केट पर बहुत हो गहरा प्रभाव पड़ा है ।
- कोविड १९ के असर से सम्पूर्ण विश्व कि अर्थव्यवस्था पर नकारात्मक प्रभाव पड़ा है।
- पूरे भारत में मौत का आकड़ा हजार से सुरू होके लोखों मे पहुँच गया है।
- इस आर्थिक चुनौति के कारण असंगठित एवं गरीब किसान निम्न स्तर के लोग सबसे बड़े संकट में है।

देश के ग्रामिण क्षेत्रों में मौसमी बेरोजगारी कि दर अधिक है। तथा कृषि कार्यो में लगी अबादी में लगी बुराई जैसे गेहू, धान।

बुआई करने के बाद उनके पास (४ से ५) महिने का दिन शेष होता है। जिसके कारण अलग-अलग शहरों में श्रमिक मजदूरो के रूप में कार्य करते है। यह मजदूर कटाई के समय पूने वापिस जाते है। क्योंकी यह उनका आमदनी स्त्रोत होता है। अनोपचारिक श्रमिको को सब्जी फल विक्रेता के रूप में देखा जा सकता है।

ऐसे समय जब कोरोना के प्रसार को रोकने के लिए लॉक डाऊन तथा कई जगह शोर करते के साथ ही साथ रेल्वे लाईल को भी बंद कर दिया गया है । यातायात के साधन बंद होने के कारण लोगों को किसी अन्य राज्यों तथा अपने गावों मे जाना बड़ा कि मुश्किल हो गया जिसकी वजह से उन्हें दो वक्त का अनाज मिल पाना बहुत बड़ी समस्या बन चुकी है। तथा भुखे मरने जैसे हलात भारत के अन्य हिस्सों में फसे मजदूर में देखी जा सकती है।

एवं उनके पास अजिविका का सेन्कंट मौजुद है। असंगठित दो शहरों में फसे हुए है। ऐसे समय मैं लॉक डाऊन के वजह से भारत में रहने वाले अधिकतम अबादि के पास न्यूनतम जरूरी संसाधन नही है।

हाँ यह बात सही यह की भारत के पास आत्मविश्वास कि कमी नही और सभी लोग डॉक्टर, पुलिस कर्मचारि नर्स आदि ऐसे लोग तन-मन से कोरोना कि लड़ाई लड़ने में पीछे नही हट रहे। तथा कुछ पैमाने में सफल भी हो रहे बाकि देशों से हमारे देश मे मरने वाली संख्या बहुत कम है। पर यह सब तात्कालिक प्रभाव है ।

जबकि दीर्घकालिक प्रभाव पर गौर करे तो इसका अनुमान लगाना मुश्किल है। साथ ही जब कोरोना वायरस के प्रकोप से देश ऊबरेगा तो उसके पास घरेलु माँग के संकट तथा उससे होने वाले परिणाम का सामना करना पड़ेगा।

''यह समस्या बड़ी और गम्भीर है।''

सवाल है इसका समाधान क्या है। हमारा (हेल्थ केयर) इतना मजबूत नही है कि वह बड़े पैमाने में इस महामारी का सामना कर सके ।

एवं दूसरा सेवाल अग यह उठता है। कि अगर यह महामारी बेकाबू हो गयी तो से हमारी मिलिसन अबादी वाले देश को सभालना बड़ा ही जटिल हो जायेगा । इसलिए हमे जागरूक होने कि तथा एकजुट होने कि तथा एकजुट होन कि आवश्यकता है।

''छति हुयी वेदना से भेर मानव को यह अहवाहन करना है।
एक जुट होकर कोरोना से अब हमें लड़ना है।''
घर पर रहकर हि सारे नियमों का सम्मान करे
''हिम्मत और आत्मविश्वास से नये भारत का निर्माण करे''

सार्वजनिक वितरण प्रणाली के द्वारा खाद्य सामग्री से राशन कार्डो के माध्यम से वितरित करे । ३३ करोड जनधन पेंशन खातों के जरिये वास्तविक लाभार्थियों को डायरेक्ट बेनिफिट किया जा सकता है। कोरोना कि इस भयंकर महामारी के कारण भारत को व्यापारिक सम्बन्धि मुद्दो पर सवाल खड़ा कर दिया है। भारत से जुड़ो मि.लि. समस्या सामने आया है।

| | | | |
|---|---|---|---|
| १) | जी डी पी | ५) | खुदरा करोबार |
| २) | निर्यात क्षेत्र | ६) | फल उत्पादक |
| ३) | उपभोक्ता | ७) | व्यापार प्रर्दशनी |
| ४) | निर्माण क्षेत्र | ८) | पाल्ट्रो सेक्टर |

इस समस्या के चलते इसका विपरीत प्रभाव राजनीतिक गतीविधियों की काफी हद तक प्रभावित किया है।

''इस सार्वजनिक स्वास्थ्य अपातकाल वैश्विक मंदी के चलते एवं राजनीतिक चुनाव एवं आंतरराष्ट्रीय दूनिया पर पड़ता तनाव ने गरीब देश, भुखी जनता तथा शरणार्थी कि संख्या एवं दुसरे देश कि लोकप्रियता एवं वैधता पर सवाल खड़े कर दिये है।

ऐसे देशों के साथ अन्य देश भविष्य में दूसरे देशो के साथ व्यवहार करने में तयार बरतेगे तथा आगे सावधान रहेंगे।

इसके चलते कोरोना के कारण मार्केट मंदी एवं उसमें गिरावट कि समस्या बढ सकती है।

राष्ट्र के प्रति भरोसा कम हो जागेया कोराना (कोविड-१९) का सबसे बड़ा प्रभाव हमारे शिक्षा - - को हुआ है। जिसके कारण करोड़ो विद्यार्थी स्कूल से बाहर है। तथा अन्य कॉलेज महाविद्यालय कि हालत बहुत ही गंभीर है। महागई के बढ़नक स्कूल में बटने वाला पोषण आहार बंद हो गया है। जो गरीब के आहार लेने का मुख्य स्त्रोत था।

हमारे भारत के कई हिस्से आज ऐसे जहॉ पर डिजिटल सेवा का विकास नही हो पाया जिससे उन्हे ई-लरनिंग शिक्षा पहुॅचाना बहुत हि कठिण कार्य तथा इस बिमारी ने सशि अर्थव्यवस्था के साथ साथ शिक्षा प्रणाली को पूर्णतः घनधकोर दिया है। इससे जग-जीवन मे खाद्य सुरक्षा पर भी बहुत बुरा परिणाम देखने को मिलता है।

इसके बावजूद लोगो कि धार्मिक आस्था पर भी बहुत गहरा असर इस (कोरोना) के कारण हुआ है। जिसके परिणाम स्वरूप मंदिर, मजिस्द, गुरुद्वारा संच आस्था के केन्द्र सारे (लॉकडाऊन) में बंद कर दिये जा चुके है।

तथा लोगो कि धार्मिक भावना मंदिर मस्जिद गुरूद्वारा चर्च में न जाकर दिल मे ही ठहर कर रह गयी है।

**निष्कर्ष** :

कहॉं जाता है। विपत्ती कुछ अपने साथ अच्छे अवसर भी लाती है। तथा जिसका परिणाम यह होगा कि लोगो मैं आपसी प्रेम तथा एकजुट कि भावना का विकास होगा। अन्य देशो से धोखा खाने के बाद (बड़े) देश अमेरिका, जपान, इटली अन्य देश भारत को व्यापार करने का केंन्द्र बना सकते है। जिसके कारण भारत के लोगो को ज्यादा रोजगार तथा डिजीटल लाइफ सटाइल बनने का सुनहरा मौका मिल सकता है। भविष्य में ऐसी गलतियाँ एंव इससे निपटने के लिए विश्व कि सरकार तथा केंद्र एवं राज्य सरकार नयी तकनीक बनाने का प्रयास करेगी।

*"Most inportant is safe nature*
*and*
*safe nature is safe human life"*

**कु. रंजना आशिष सागर**
मो. 9657867481

# भारतीय स्वातंत्र्य आंदोलन क्रांतीकारकांचे योगदान

*''आज सलाम आहे त्या वीरांना*
*ज्यांच्यामुळे आज हा दिवस पाहिला*
*ती आई आहे भाग्यशाली जिच्यापोटी*
*जन्मलेल्या वीरांमुळे हा देश अखंड राहिला ।''*

भारतीय स्वातंत्र्य चळवळ ही ऐतिहासिक घटनांची मालिका होती, ज्यांचा अंतिम उद्देश भारतातील ब्रिटीश राजवट संपवणे हा होता. हा स्वातंत्र्यलढा १८५७ ते १९४७ या काळात चालला. भारतीय स्वातंत्र्यासाठी पहिली राष्ट्रवादी क्रांतीकारी चळवळ बंगालमधून उद्यास आली होती. प्रमुख राष्ट्रीय नेत्यांनी स्थापन केलेल्या भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने या चळवळीचा पाया भक्कम केला. २० व्या शतकाच्या पूर्वार्धात लाल बाल पाल अरविंद घोष आणि व्हीबो पिदंबरम पिल्लई यांनी स्वराज्यासाठी अधिक मुलगामी दृष्टीकोन पाहिला.

१९२० मधील स्वराज्य संघर्षाच्या शेवटच्या टप्प्यात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने महात्मा गांधी यांच्या अहिंसा आणि सविनय कायदेभंगाच्या धोरणाचा अवलंब केला. रवींद्रनाथ टागोर, सुब्रमण्यम भारती आणि बंकिमचंद चट्टोपाध्याय यांच्यासारख्या अनेक विचारवंतांनी देशभक्तीची भावना जगसागरात परसवली. तर सरोजीनी नायडू, प्रतिलता वड्डेदार आणि कस्तुरबा गांधी यासारख्या महिला नेत्यांनी महिलांना स्वातंत्र्यालढ्यात सहभाग घेण्यासाठी प्रोत्साहन दिले. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील वंचित घटकांना मदत केली.

